# जलप्रपात आणि मी
## लेखांक दुसरा ( इग्वात्झु फॉल्स)

आम्ही दोघेही अंटार्क्टिका क्रुझ वर असताना सुरेखाच्या नव्या क्रुझ मैत्रिणींची (क्रेझी नव्हे) बरीच घसट जमली. आमचे झोडियाक क्रुझ ट्रिप किंवा कॉन्फरन्सेस नसले तर त्यांची गट्टी जमत असे. त्या वेळी कधीतरी, कुणीतरी, "इग्वाझू फॉल" चा किडा हिच्या डोक्यात घातला. बस्स, नंतर तिची यंत्रणा सुरु झालीय. आमच्या कुटुंबीयांची सर्व प्रवास योजना व यंत्रणा सुरेखाच सांभाळते. आमची रिमोट एरिया मेडिकल (रॅम) ची दरवर्षी होणारी गायाना, होन्डुरस, व अरुणाचल प्रदेशच्या १०-१२ लोकांची सगळी यंत्रणा सुरेखाच निस्वार्थपणे करते व सर्वांना ती सांभाळते. रॅमचा संस्थापक स्टॅन ब्रॉकला तर हिच्याशिवाय चुकचुकल्यासारखं होतं.

तिला माझ्या पाण्याने वेड माहीत होते. धबधबा तर, मी अगदी अर्ध्या पायांवर तयार. हे तिला माहीत होते. ह्या वेडापायी आम्ही जवळपास सर्वच जगप्रसिध्द धबधबे अगदी जवळून अनुभवले. क्रुझ ची गोष्ट सुद्धा तीच. म्हणजे नुसते पाहायचे व वरून वाहत्या पाण्यातच किंवा उंचावरून ओढळणारा धबधबा प्रत्यक्ष अनुभवणे. ह्या असल्या जीवघेण्या धबधब्यांचे वेड होते मला. पूर्ण जलप्रपात, सगळा फोर्स डोक्यावर, ऑलमोस्ट. अगदी माझ्या नांवाप्रमाणेच भगवान शंकराचा अवतारच.

काही वर्षांपूर्वी नायगारा फॉल वरून अक्रॉस केबलवॉक घेण्याचा विचार सुध्दा आला होता. पण वय, शरीरयष्टी, योग्य मार्गदर्शकाचा अभाव ह्या कारणाने तो विचार मागे पडला. तरीही सुरेखाच्या अनुपस्थितीत, २००१-०२ साली ब्रिटिश गायाना सर्जिकल कॅम्प च्या वेळेला तेथील कैट्यूर फॉलच्या खळबळणाऱ्या उगमात वापिशाना नदीच्या पात्रामध्ये उंच झाडांवरून मी उड्या मारल्या होत्या. पुढे हीच नदी अँमेझोनला जाऊन मिळते. त्याबद्दल मी माझ्या "स्वान्त सुखाय" व " Eternal Happiness" ह्यांत वर्णन केले आहे.

२०१२ च्या आफ्रिकन सफारी नंतर आम्ही जगप्रसिध्द विक्टोरिया फॉल ला गेलो. झिम्बाब्वे देशाच्या ज्या गांवी आमची राहायला एजंटनी सोय केली होती, तेथील एकमेव होटेल मालक मराठी जाणकार एक गुजराती पटेल होता. व त्यापेक्षा मजेदार गोष्ट अशी की त्याची आई "प्युअर वेजिटेरियन". म्हणजे सुरेखाची चंगळ. तिने मागील एक्कावन वर्षे अमेरिकेत अंडे, मांस -मासेला न शिवता संसार थाटला. सुंदर गोड बोलून सर्वांची मन जिंकते व त्यामुळे मला सुद्धा आवडीचे खायला मिळतं. आंतरराष्ट्रीय प्रवासींनी त्या त्या देशातील विविध प्रकारचं अन्न चाखायला हवं. अर्थात हे माझ मत. लिहू शकेन परंतु लादणे जमणार नाही.

त्या पटेल आईची ओळख झाली व दररोज आम्हा दोघांना चहासोबत पोहे, उपमा, व थालीपीठ मिळाले. तीन दिवस मस्त मजेत गेले. परंतु एवढ्या नियोजक व्यक्तीने ह्या झिम्बाब्वे टूरमधे थोडी गडबड केलीज व मला खूप वाईट वाटले. ते असे,

हया वर्षी झिम्बाब्वेत पाऊस कमी पडला व सीझनच्या आधी जून-जुलै मध्ये आम्ही तेथे गेलो. नदीच्या पात्रात फार फार कमी प्रमाणात पाणी वाहत होते. एवढा जगप्रसिध्द धबधबा अगदी कोरडा शुष्क. आम्ही दोघेही, इतर वेळी भरून दुथडी वाहणारी नदीच्या पात्रात पायी पायी एका कांठावरून दुसरींत, झिम्बाब्वे ते झाम्बीया आंतरदेशी नदीतून पायी गेलो. एकीकडून दुसरीवर ये जा केली. हे ही करण्यात एक और मजा येते. अर्थात तिसरीकडून साऊथ आफ्रिका मधून विक्टोरिया फालची मज्जा आली तरी पण मुख्य फॉल ला मुकलो.

इतर अनेक धबधब्यांचे दर्शन घेतले व प्रत्येकीत डुबकी मारली. त्यात पंचमढीची नर्मदा व जबलपूरच्या विख्यात भेडाघाट धबधब्याचा सुध्दा समावेश आहे. नाही म्हणायला महाराष्ट्रातील जोग फॉल्स व्हायचं आहे. ते सुध्दा एखाद्या वेळेस काबीज करू.

हा झाला इतिहास. आम्ही दोघांनीही अंटार्क्टिका क्रुझ अतिशय आनंदाने उपभोगले व तो सर्व दृष्टीने यशस्वी झाला. लौकरच क्रुझ संपला. बहुतेक सर्वच परस्पर आपापल्या गावी गेले. बिचाऱ्या मेल्फर्ड पाचे इतर सहप्रवाशी तर गावी परत जायला उत्सुक दिसले.

पण ....हे इग्वाझूच्या प्लॅनचं काय?

सुरेखाची यंत्रणा चुकणार नाही. तरी पण मी मुख्य म्हणजे आढेवेढे घ्यायला हवं होतं. मी काही बोललोच नाही.

क्रुझ संपला. सर्वांना "आम्ही जातो अमुच्या गांवा. अमुचा राम राम घ्यावा." गुड बाय केलं.

आम्ही उशिआई गावात एक रात्र आणि पाच दिवस इग़्वाझू फाल्स मध्ये घालवली. उशिआईच्या गाईडला इंग्रजीचे अक्षरही येत नाही व आम्ही दोघे स्पॅानिश मध्ये शुम्भ. त्याच्या सेलफोनवर गुगलचा आँटो भाषांतरचा अँप होता. आम्ही दोघांनी इंग्रजीत विचारलेल्या सर्वच प्रश्नांची उत्तरे त्याने तो अँप वापरून इंग्रजीतून दिली. अर्थात सेलफोन मार्फत.

तेथील प्रेक्षणीय स्थळे बघितली. परतु ते एक औपचारिक रित्या. आमचे मन इग़्वाझूत गुंतले होते. रात्री फ्लाईटने आम्ही ब्युनस ऐरिस नंतर ब्राझीलच्या इग़्वाझू फॉल गांवी पोचलो. आंतरराष्ट्रीय प्रवास म्हणजे किमान एक तास वाया जाणार हे नक्की. कस्टम, इमिग्रेशन आटोपून बाहेर पडेपर्यंत उगीच वेळ जातो. बाहेर गाईड वाट पाहत असणार. उगीच त्याची काळजी वाटली.

पुन्हा इंग्रजी किंवा स्पॅनिश किंवा ह्या ब्राझीलची भाषा पोर्तुगीझ पैकी कोणती भाषा वापरावी लागते हा विचार डोक्यात असताना अस्सल अमेरिकन इंग्रजीतून बोलणारा होजे रिवेरा स्वागतासाठी आमच्या नांवाची पाटी घेऊन अराईवल ओळीत होता.

"वेलकम टू ब्राझीलियन इग़्वाझू फॉल्स डॉक्टर अँड मिसेस मँडिवार."  अँम आय् सेईंग युवर नेम राइट?" मी दुरूस्त करण्याची भानगड केली नाही.

पटकन आमची कार्ट व हातातील सामान घेतले अन पार्किंग लॉट मध्ये उभ्या व्हॅन मध्ये ठेवले. आमचे सोबतचे सहप्रवाशी ह्या आधीच होटेल मध्ये गेले. बसल्या बसल्या त्यांनी पुढच्या तीन दिवसांचा दिनक्रम दिला. वरून ह्यात आवश्यक बदल आमच्या इच्छेप्रमाणे करता येईल असं आश्वासन दिलं.  विन्डहम होटेल मध्ये तीन रात्र राहायला व न्याहारीची व्यवस्था होती.

इग़्वाझू फॉल तीन देशांच्या सरहद्दीत पसरलेला आहे. आर्जेन्टिना, ब्राझील व पाराग्वे. तेथे २७८ छोटे मोठे फॉल्स आहेत. येथून व आर्जेन्टिना कडून फॉल अती सुंदर दिसतो. मला उगीच वाटले की ब्राझीलला येण्याचा व व्हिसाचा खर्च व त्रास वाचला असता. पण त्या कांठावर राहायला योग्य सोय नाही. येथे बर्ड सँक्च्युयरी आहे ते पाहिले पाहिजे. इथे अगदी जवळून निरीक्षण करणे सोपे आहे. कारण सरकारने लांबचलांब इन्टर आयलंड वॉकवे बांधले आहे. सतत अंगावर उडणाऱ्या पाण्याच्या तुषारांमध्ये भिजून घेण्याची मजा औरच आहे. व शिवाय इथून एकाच वेळी अनेक इंद्रधनुष्यं दिसतात. दोन्ही बाजूंनी हे अतिशय प्रेक्षणीय स्थळ आहे. मुख्य म्हणजे हीच वेळ व हा सीझन फॉंल पाहायला सर्वात उत्तम.

एक संपूर्ण दिवस ब्राझिलियन फॉल जवळून बघितले. पाण्याचे तुषार अंगावर घेतले, ओले चिंब झालो. खूप, दोन तरी व्हिडीओचे कार्ड रेकॉर्ड केले असावे. संपूर्ण गोल इंद्रधनुष्य अनेकदा दिसलं व आठवणीसाठी त्याचे अनेक फोटो काढले. एक्स्ट्रा स्पेअर कपडे आणले ते बदलून उरलेला दिवस ब्राझिलियन साईडला घालवला.

आर्जेन्टिनाकडून तोच फॉंल परंतु आणखी वेगळा व सुंदर दिसला. तेथील वॉकवे छोटाच होता. परंतु

खरी मजा आगळीच. त्यासाठी मैल दोन मैलाची सफारी घ्यावे लागले. त्यांत उघड्या व्हॅनच्या गाईडनी अनेक नव नवीन पक्षी जवळच जंगलात झाडावर बसलेले दाखवले. बरेचदा तर त्यावर फोकस करून फोटो क्लिक करेपर्यंत पक्षी उडून जायचे.

व्हॅन मध्ये बसून सूचनेवरून अंगावरचे कपडे बदलले व पायात वॉटरप्रुफ जोडे घालून, काठावर उभ्या सिटेड झोडियाकमध्ये ओळीत बसलो. तिथे आम्ही एखादा तास, दोन तास निरनिराळ्या फॉल्स्चे जवळून निरीक्षण केले.

आम्ही अनेकदा नायगारा फॉलची "मेड आफ द मिस्ट" नांवाची बोट घेतली होती. तेथे एकतर दाटीवाटीने प्रवासी कोंबतात, व थोडक्यात अगदी जवळून धबधबा दाखवतात. थोडक्यात किंचित वेळ "जल प्रपात" भासतो.

इथे मात्र मस्त स्वतःला उघड्या बोटीवर बसवून २७८ फॉल्समधून फिरवून आणतात. आणि काही निवडक उंच व दाट फॉलच्या खालून बोट जाते. त्या खाली सर्वांगाची मालिश होते. सर्व अंग घुसळून निघाले. हाडं न् हाडं खिळखिळी झाली नि मस्त मजा आली. अगदी "पैसा वसूल." खूप जोरदार फोर्सने १५९ मीटर उंचीवरून व आणखी खूप फोर्सने पाण्याचे ओघळ धो धो अंगावर कोसळले की स्वर्गसुख मिळाले.

मी सुरेखाला मनापासून अतिशय सुंदर यंत्रणा केल्याबद्दल शाबासकी दिली. पुढचा संपूर्ण दिवस आम्ही दोघेही एका समाधानी शांत शांत स्वप्नसृष्टीत हवेत उडत होतो. अगदी शरिरात ऑटो पायलट असल्यासारखे हवेत उडत पुढचा प्रवास केला. लीनताकडे थोडे थांबून आमच्या स्वत:च्या घरी कधी पोचलो त्याचा पत्ताच नाही.

मनात उद्घोष करत होतो. "पुन्हा पुन्हा जय दक्षिण ध्रुव जय जय इग्वात्झु, जय, जय जय जय जलप्रपात व जय जल प्रताप."

**गंगाधर मद्दीवार**

**बँनर केन्टकी**